महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार इमारत,
मुंबई - ४०० ०३२
दूरध्वनी क्र : ०२२ २२७९३८४० Email ID : napu२८.mhpds@gov.in

---

क्रमांक : अधापु-२०२०/प्र.क्र.५९/नापु-२८ दिनांक : २१ जानेवारी, २०२१

प्रति,

नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
उपायुक्त पुरवठा (सर्व )सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

विषय :- दिव्यांगजनाचा समावेश अंत्योदय अन्न् योजनेमध्ये करण्याकरीता केंद्र शासनाच्या सूचनाबाबत

विषयाधिन प्रकरणी मा.केंद्रीय मंत्री, उपभोक्ता मामले, खाद्य आणि सार्वजनिक वितरण, भारत सरकार यांचे दिनांक ३१.०७.२०२० चे पत्र व केंद्र शासनाचे दिनांक २४.०७. २०२० चे पत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत समाविष्ट दिव्यांग नागरीक ज्यांना दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे, अशा नागरीकांचा समावेश अन्न सुरक्षा योजनेंतर्गत करण्यात यावा, असे केंद्र शासनाच्या दिनांक ३१.०७.२०२० च्या पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच सदर दिव्यांग व्यक्तींना वितरित करण्यात आलेल्या शिधापत्रिकांची स्वंतत्र नोंद देखरेख व रेकार्डसाठी घेण्याबाबत केंद्र शासनाच्या सूचना आहेत. जे दिव्यांग नागरीक अंत्योदय अन्न योजनेच्या निकषानुसार सदर योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत त्यांना अंतोदय अन्न योजनेचा लाभ देण्यात यावा. व उर्वरित पात्र दिव्यांग लाभार्थींना प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ देण्यात यावा, अशा केंद्र शासनाच्या सूचना आहेत.

३. केंद्र शासनाने दिनांक २५.१२.२००० रोजी अंत्योदय योजना सुरू केली आहे. सदर योजनेंतर्गत गरिबातील गरिब (Poorest of the poor) कुटुंबास दरमहा ३५ किलो धान्य गहू-२ रूपये व तांदूळ-३ रूपये प्रती किलो या दराने वितरीत करण्यात येत आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थी कुटुंबाचा २५,०५,३०० एवढा इष्टांक मंजूर केला आहे. केंद्र शासनाने राज्य शासनास वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार शासन निर्णय दिनांक १७.०७.२०१३ व शासन शुद्धीपत्रक दिनांक

Scanned by CamScanner

१४.११.२०१३ नुसार अंत्योदय अन्न योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी पात्र लाभार्थ्यांचे निकष आहेत. त्यानुसार दिव्यांग लाभार्थी व्यक्तींची अंत्योदय अन्न योजनेचे लाभार्थी म्हणून निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निकषामध्ये तरतूद आहे.

१) ज्या कुटुंबाचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी वा अपंग किंवा ६० वर्षे वयावरील वृध्द आहेत व ज्यांना उदरनिर्वाहाचे निश्चित साधन नाही अथवा सामाजिक आधार नाही.

२) एकटे राहात असलेले दुर्धर आजारग्रस्त / अपंग / विधवा / ६० वर्षावरील वृध्द, ज्यांना कौटुंबिक वा सामाजिक आधार अथवा कायम स्वरूपी उत्पन्नांचे साधन उपलब्ध नाही.

४. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य गटातील कुटुंबाना सवलतीतील अन्नधान्याचा लाभ मिळण्याबाबत पात्रता निकष दि. १७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहे. त्यानुसार दारिद्र रेषेखालील (पिवळी) सर्व शिधापत्रिकाधारकांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समावेश करण्यात आलेले आहे. तसेच दारिद्रय रेषेवरील (केशरी) शिधापत्रिकाधारकांपैकी ग्रामिण व शहरी भागातील अनुक्रमे रूपये, ४४०००/- व रू. ५९०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या शिधापत्रिकांचादेखील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग व्यक्तीकडे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांमध्ये समावेश होण्याकरीता संबंधिताकडे शिधापत्रिका असणे आवश्यक आहे.

५. केंद्र शासनाच्या उपरोक्त सूचनानुसार राज्यातील दिव्यांग व्यक्तींना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत योजनेच्या निकषानुसार व लाभार्थ्यासाठी विहीत केलेल्या पात्रतेनुसार अंतोदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजनेचा लाभ देण्यात यावा व दिव्यांग व्यक्तींना वितरित करण्यात आलेल्या शिधापत्रिकांची स्वतंत्र नोंद देखरेख व रेकार्डसाठी घेण्यात यावी. तसेच त्यांना वितरीत होणाऱ्या अन्नधान्याची नोंदही स्वतंत्रपणे ठेवावी. यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

( महेश कानडे )
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे
प्रतः- निवडनस्ती नापु-२८ ( संग्रहार्थ )

Scanned by CamScanner

D.O.No. 2237/MO CA, F&PD/VIP/2020


राम विलास पासवान
RAM VILAS PASWAN

उपभोक्ता मामले,
खाद्य और सार्वजनिक वितरण
मंत्री
भारत सरकार
नई दिल्ली - 110 001
MINISTER
FOR CONSUMER AFFAIRS,
FOOD & PUBLIC DISTRIBUTION
GOVERNMENT OF INDIA
NEW DELHI-110 001


मुख्यमंत्री सचिवालय 28 AUG 4404128

02 SEP 2020

31 JUL 2020

केन्द्र सरकार द्वारा गरीबों के कल्याण के लिए चलाई जा रही राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजना का लाभ देश भर के सभी जरूरतमंद और पात्र लाभुकों को मिले, यह सुनिश्चित करने में सभी राज्य सरकारें पूरी तरह सहयोग कर रही हैं।

समाज के कमजोर वर्ग में शामिल दिव्यांगजनों को भी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजना का लाभ उसी तरह से मिलना चाहिए, जिस तरह अन्य पात्र लाभार्थियों को मिल रहा है। इसी प्रसंग में आपका ध्यान माननीय दिल्ली उच्च न्यायालय द्वारा हाल ही में केन्द्र सरकार और सभी राज्य सरकारों को जारी उन निर्देशों की ओर आकृष्ट करना चाहूंगा, जिसमें यह निर्देश दिए गए हैं कि दिव्यांगता अधिनियम, 2016 के तहत कवर किए गए ऐसे दिव्यांगजन, जिनके पास राशनकार्ड नहीं हैं, परन्तु सक्षम प्राधिकरण द्वारा उन्हें दिव्यांगता प्रमाणपत्र जारी किया गया है, उन्हें भी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजना में शामिल किया जाए।

वर्ष 2003 में जब अंत्योदय अन्न योजना का विस्तार किया जा रहा था, उस समय जारी किए गए दिशा-निर्देशों में इस योजना में दिव्यांगजनों को भी शामिल करने और उन्हें विशिष्ट राशनकार्ड जारी करने के स्पष्ट निदेश दिए गए थे।

इस संबंध में मेरे विभाग द्वारा दिनांक 24 जुलाई, 2020 को सभी राज्यों के प्रधान सचिवों/ खाद्य सचिवों को एक पत्र भेजा गया है **(प्रतिलिपि संलग्न)**, जिसमें यह अपेक्षा की गई है कि दिव्यांगजनों को भी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम, 2013 के प्रावधानों का लाभ मिले। इस पत्र में यह भी अनुरोध किया गया है कि दिव्यांगजन श्रेणी के तहत पहचान किए गए व्यक्तियों का डाटा भी संकलित किया जाए।

जारी .....2...

Office : Room No. 179, Krishi Bhawan, New Delhi-110 001. ☎ 011-23070637, 23070642, Fax : 011-23386098.
Resi. : 12, Janpath, New Delhi - 110001. ☎ 011-23015249, 23017681

Scanned by CamScanner

मेरा आपसे आग्रह है कि आप यह सुनिश्चित करेंगे कि दिव्यांगजनों को अंत्योदय

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner